**वाचा**-१) मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई यांचे पत्र क्र.कोरोना/२०२०/प्रक्र.५८ /आरोग्य-५ दि.१४.०३.२०२०.

२) साथरोग प्रतिबंधक कायदा १८९७ चे खंड २,३ व ४

३) सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील अधिसुचना क्र.करोना २०२०/ प्रक्र.५८/आरोग्य -५ दि.१४ मार्च,२०२०.

४) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र.डीएमयु२०२०/प्रक्र.९२(भाग-२) /डीएमयु-१ आपत्ती व्यवस्थापन मदत व पुर्नवसन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई दि.१७.०४.२०२०.

**विषयः**- राज्यात कोरोना विषाणू (कोव्हीड १९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपायोजना करण्याबाबत. **(साखर कारखान्यातील ऊसतोडणी कामगार, ऊस वाहतुक करणारे कामगार व त्यांच्या कुटूंबियांची माहिती व तपासणीबाबत)**

जा.क्र.२०२०/आपत्ती व्यवस्थापन कक्ष /टे-१/सीआर.
जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड
दि.१८.०४.२०२०

**परिपत्रक**

उपरोक्त विषयी संदर्भीय पत्र क्र.१ अन्वये मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई यांनी राज्य शासनाने कोरोना विषाणूचा (कोव्हिड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दि.१३ मार्च २०२० पासून लागू करुन खंड २,३ व ४ मधील तरतुदीनुसार दिनांक १४ मार्च,२०२० अधिसुचना निर्गमित केली आहे. त्यामध्ये मला उक्त प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपायोजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी संक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे.

तसेच, संदर्भ क्र.४ वरील पत्रान्वये, मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांनी राज्यातील साखर कारखान्यातील ऊसतोडणी कामगार, ऊस वाहतुक करणारे कामगार व त्यांच्या कुटूंबियांना मुळ गावी पाठविण्याबाबत अटी व शर्तीच्या अधिन राहून संबंधित प्रशासकीय यंत्रना व संबंधित कारखान्याचे व्यवस्थापकीय संचालक यांना सुचना दिल्या आहेत. त्यानुसार नांदेड जिल्हयात राज्यातुन विविध ठिकाणाहून असे ऊसतोडणी कामगार, ऊस वाहतुक करणारे कामगार व त्यांच्या कुटूंबियासह त्या त्या गावाता येतील अशा वेळी सर्व संबंधित तहसिलदार यांनी खालील निर्देशाप्रमाणे कार्यवाही करावी.

- सर्व संबंधित कारखान्याचे व्यवस्थापकीय संचालक हे संबंधित जिल्हयाचे जिल्हाधिकारी यांचेमार्फत कामगारांचे गावनिहाय यादी प्रमाणित करुन घेवून त्या यादीची प्रत या कार्यालयास संबंधित तहसिल कार्यालयास व संबंधित गावाच्या सरपंचाकडे देवून यादी प्रमाणे कामगारांना त्यांच्या मुळ गावी सोडण्याची व्यवस्था करणार आहेत.
- तहसिलदार यांनी वरील प्रमाणे प्राप्त यादीप्रमाणे कामगार ज्या जिल्हयातुन येणार त्या जिल्हयाच्या जिल्हाधिकारी यांनी मंजुरी दिलेली यादी प्रमाणे तीच व्यक्ती/कामगार गावात आली किंवा कसे याबाबत पडताळणी करुन घेवून अशी यादी सरपंच, पोलीस पाटील व तलाठी यांचेमार्फत प्रमाणीत करुन घेवून एक प्रत तहसिल कार्यालयात जमा करुन घ्यावी.

Scanned with CamScanner

- अशा कामगारांची तात्काळ संबंधित वैद्यकीय अधिकारी यांचेमार्फत तपासणी करुन घ्यावी, तपासणी अंती वैद्यकीय अधिकारी यांचे सल्यानुसार सदर व्यक्तीस प्रादुर्भावाची लक्षणेची दिसून आली नसल्यास त्यास गृह विलगीकरण (Home Quarantine) करावे तसेच, तपासणीमध्ये प्रादुर्भावाची लक्षणे किंवा संशयास्पद स्थिती आढळून आल्यास त्यास तात्काळ शासकीय विलगीकरण (Institutional Quarantine) केंद्रात दाखल करावे.
- वरील प्रमाणे तालूक्याची एकत्रित गावनिहाय कामगारांची माहिती संबंधित तहसिलदार यांनी या कार्यालयास सादर करावी.
- विना परवानगी वरील प्रमाणे कोणतीही व्यक्ती /ऊसतोड कामगार गावामध्ये प्रवेश करणार नाही याची जबाबदारी ॲन्टी कोरोना कवच / फोर्स यांची राहील.
- वरील प्रमाणे निर्देशाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने संबंधित तहसिलदार यांनी त्यांचे स्तरावरुन यंत्रणा कार्यान्वीत करण्यासाठी आवश्यक ते आदेश निर्गमित करावेत.

वरील निर्देशाची अंमलबजावणी व पर्यवेक्षणाचे काम सर्व संबंधित उपविभागीय अधिकारी यांनी करावे.सदर परिपत्रकाचे उल्लंघन करणा-या कोणत्याही व्यक्ती, समुह यांचे विरुध्द आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ मधील तरतुद व भारतीय दंड संहिता कलम १८८ व इतर संबंधित कायद्यानुसार कारवाई करण्यात येईल.

या कामात कोणतेही अधिकारी/कर्मचारी यांच्या कडून कुचराई/दिरंगाई केल्याचे निदर्शनास आल्यास त्यांचे विरुध्द महाराष्ट्र कोव्हीड -१९ उपायोजना नियम २०२० मधील तरतुद व आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ च्या कलम ५१ व इतर अनुषंगीक कायद्यानुसार कारवाई करण्यात येईल.

स्वा/-
(डॉ.विपीन इटनकर)भा.प्र.से.
**जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नांदेड**

**प्रत माहितीस्तव सविनय सादर.**
१) मा.विभागीय आयुक्त, औरंगाबाद
**प्रतिलीपी, माहिती व कार्यवाहीस्तव**
२) आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड
३) मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,नांदेड
४) पोलीस अधीक्षक, नांदेड
५) जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, नांदेड
६) सर्व उपविभागीय अधिकारी, नांदेड जिल्हा
७) सर्व तहसिलदार, नांदेड जिल्हा
८) जिल्हा शल्य चिकित्सक नांदेड
९) जिल्हा आरोग्य अधिकारी,जि.प.नांदेड
१०) सर्व मुख्याधिकारी नगरपालिका/नगरपंचायत

OFFICE OF THE COLLECTOR NANDED

**जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नांदेड**

Scanned with CamScanner